सुधारीत प्रेस नोट                    दिनांक :– ०५/१२/२०२२

अंबिकाबाई जाधव महिला महाविदयालय, वज्रेश्वरी येथिल प्राध्यापक, लिपिक व शिपाई यांना लाचेची मागणी करुन स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो /घटक | ठाणे |
| पोलीस ठाणे/ गुन्हा नोंद कमांक | गणेशपुरी पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण |
| आरोपी लोकसेवकाचे/खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | १) महादेव बुवाजी कांबळे, प्राचार्य अंबिकाबाई जाधव महिला महाविदयालय, वज्रेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे. **(पाहीजे असलेला आरोपी)**<br>२) सुग्रिव बाबुराव आंधळे, वय ५२ वर्षे, प्राध्यापक, अंबिकाबाई जाधव महाविदयालय, वज्रेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे.<br>३) वसंत भाऊ हरड, वय ५७ वर्षे, शिपाई, अंबिकाबाई जाधव महाविदयालय, वज्रेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे.<br>४) रविंद्र बाबाराव कांबळे वय ५१ वर्षे, कनिष्ठ लिपिक, अंबिकाबाई जाधव महाविदयालय, वज्रेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे. |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/– रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | २,००,०००/– रुपये स्विकारले |
| थोडक्यात हकीकत | सदर प्रकरणातील तकारदार या नमुद महाविदयालयात प्राध्यापक म्हणुन काम करीत असताना वैदकीय कारणास्तव सुमारे तिन महीने कामावर हजर नव्हत्या त्यांना कामावर हजर करून घेण्याकरीता व त्यांचे नमुद कालावधीमधिल ३ महीन्यांचे वेतन काढुन देण्याकरीता यातिल पाहीजे आरोपी प्राचार्य महादेव कांबळे यांनी तकारदार यांचेकडे लोकसेवक प्राध्यापक आंधळे यांचे समक्ष ५ लाख रूपये लाचेची मागणी केली असुन सदरचे मागणीस लोकसेवक आंधळे यांनी प्रोत्साहन दिले आहे.<br>त्याप्रमाणे आज दि.०५/१२/२०२२ रोजी यातील पाहिजे असलेला लोकसेवक प्राचार्य महादेव कांबळे यांनी आलोसे शिपाई वसंत हरड यांना तकारदार यांचेकडुन लाचेच्या रकमेपैकी २,००,०००/– रूपये रक्कम स्विकारण्यास सांगितले, तसेच सदरची रक्कम स्विकारण्यास आरोपी क ४ रविंद्र कांबळे यांनी शिपाई वसंत हरड यांना प्रोत्साहीत करून सदरची रक्कम घेवुन घरी ठेवण्यास सांगितले त्याप्रमाणे शिपाई वसंत हरड यांनी तकारदार यांचेकडुन २,००,०००/– रूपये स्विकारले असता त्यांना १३:२८ वा रंगेहाथ ताब्यात घेतले असुन आलोसे क ०२ आंधळे व ०४ रविंद्र कांबळे यांना कार्यालयातून ताब्यात घेण्यात आले आहे. यातील पाहीजे आरोपी प्राचार्य महादेव कांबळे यांचा शोध घेत आहोत.<br>सदरबाबत गुन्हा नोंदविण्याची कारवाई गणेशपुरी पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण येथे सुरु आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी– मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :– लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :–acbmaharastra@mahapolice.gov.in
ईमेल–spacbthane@mahapolice. Gov.in
अॅप्लीकेशन –acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर –१०६४, दुरध्वनी कमांक –०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅप्स कमांक –९९३०९९७७००
दिनांक :– ०५/१२/२०२२

ASPatil
( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

पोलीस उप अधिक्षक ★ अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे ★ सत्यमेव जयते